## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र. ८०/२०१९/जळगांव**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. भगवान भादु चौधरी<br>मु. पो. फेकरी, ता. भुसावळ, जि. जळगांव | कार्यकारी अभियंता (तांत्रिक), भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र यांचे कार्यालय, दिपनगर, ता. भुसावळ, जि. जळगांव. | उपमुख्य अभियंता (प्रशासन), भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र यांचे कार्यालय, दिपनगर, ता. भुसावळ, जि. जळगांव. |

**व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - १५/०६/२०२३**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २६/०७/२०१८ | ----- | ---- | ०१/०९/२०१८ | ०१/०९/२०१८ | ---- |

अपिलार्थी यांनी दि. ०२/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये " जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्देशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ दिनांक २४/०७/२०१८ नुसार मागितलेली माहिती मिळावी.

२. सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी, तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" प्रकल्प ग्रस्तांच्या प्रगकुशल प्रशिक्षण घेण्याकरिता काढलेल्या बॅचेसच्या ऑफिस नोटांच्या साक्षांकित प्रति मिळाव्यात, आपल्या कार्यालयाकडून प्रकल्प ग्रस्तांच्या, प्रगतकुशल प्रशिक्षण घेण्याकरिता काढलेल्या बॅचेसच्या ऑफिस नोटसच्या सुरवात पासून आजपर्यंत साक्षांकित प्रती मिळाव्यात. "

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहितीचा अधिकार अधिनियम २००५ दिनांक २४/०७/२०१८ नुसार मागितलेली माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुचीत केले की, अपिलार्थी यांचा दिनांक २६/०७/२०१८ रोजी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. योगेश ल. खाडे यांच्याकडे सादर केलेला होता. सदर अर्जात मागीतलेली माहिती ही भुऔविकेंद्रातील संबंधित मानव संसाधन विभाग सहा. महाव्यवस्थापक यांच्या विभागाशी निगडीत असल्याने त्याच्या कडुन माहिती मिळण्यास सहाय्य घेतले होते, सदर विभागाने माहिती ही २८ पानामध्ये दि. २१/०८/२०१८ रोजी उपलब्ध करुन दिलेली होती व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास रक्कम भरण्याचे पत्र दि. २३/०८/२०१८ रोजी दिले. अर्जदार यांनी दि. २८/०८/२०१८ रोजी रक्कम भरली व दि. २९/०८/२०१८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना माहिती पुरविल्याचे जावक रजिस्टरच्या नोंदीवरुन दिसून येत आहे.

२) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुचीत केले की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री. नितिन ग. पुणेकर यांनी दिनांक १७/०९/२०१८ रोजी अपिलाची सुनावणी संपन्न झाल्याचे व अपिलाच्या सुनावणीसाठी अपिलकार श्री. भागवत भादू चौधरी, तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधित विभागामध्ये पुरवलेल्या माहिती व्यतीरीक्त माहिती उपलब्ध असल्यास संबंधित विभाग प्रमुख यांनी अपिलकार यांना माहिती पुरविण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी संबंधित विभागास वरील पुरवलेल्या माहिती व्यतीरीक्त माहिती उपलब्ध असल्यास माहिती पुरविल्याबद्दल पत्रव्यवहार केलेला उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे, परंतु त्याव्यतीरीक्त माहिती उपलब्ध नसल्याने माहिती पुरविली नसल्याचे दिसुन येते.

३) अपिलार्थी यांनी सुचीत केले की, सदर माहिती अर्ज प्रत्यक्ष दिला असुन माहिती अर्जान्वये प्रकल्पग्रस्तांच्या प्रगकुशल प्रशिक्षण घेण्याकरिता काढलेल्या बँचेसच्या ऑफिस नोटांच्या साक्षांकित प्रति मिळाव्यात तसेच सदर बॅचेस २०१० पासुन तयार केलेल्या आहेत. संबंधीत अधिकारी यांनी माहिती शुल्क कळविले असुन सदर शुल्क भरुन देखील अपूर्ण व अस्पष्ट माहिती पूरविली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली सर्व माहिती मिळावी ही विनंती.

४) सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहितीचा कालावधी नमुद केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे त्यांनी कोणत्या कालावधीची कुठून ते कुठ पर्यंतची माहिती हवी आहे हे कळुन येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती पुरविली असल्याचे दिसुन येते. तरी देखील आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन्हा एकदा उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (तांत्रिक), भु.औ.वि.केंद्र, दिपनगर यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली उपलब्ध माहिती पुन्हा एकदा आयोगाचे आदेश प्राप्त होताच अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन दयावी.

वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रतिलिपी- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य अभियंता (नि सं व सु), भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र दिपनगर, ता. भुसावळ, जि. जळगांव.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनांनुसार आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश सर्व संबंधितांवर बजावून त्याची दिनांकित पोच आयोगास सादर करावी.

**जावक क्र.** अपो-2202 01 DEC 2023